महाराष्ट्र पोलीस
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in

दिनांक :– १३/०९/२०२४

# प्रेस नोट

## वाशिम जिल्हा गणेशात्सव व गणेश विसर्जन सन २०२४

वाशिम जिल्हयामध्ये दि.०७.०९.२०२४ रोजी एकुण ७८४ परवानाधारक गणेश मंडळांच्या गणेश स्थापणा झालेल्या आहेत. जिल्हयामध्ये गणेशोत्सव व गणेश विसर्जन शांततेत पार पडावेत याकरीता वाशिम पोलीस दलातर्फे प्रभीव प्रतिबंधंक कारवाया करण्यात आलेल्या आहेत. जिल्हयामध्ये शहरी व ग्रामीण भागांमध्ये दि.१६.०९.२०२४ ते १९.०९.२०२४ या कालावधीमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकांचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हयातील डॉक्टर संघटनांनी व सामाजीक संघटनांनी ध्वनीप्रदुषण तसेच लेझर लाईट मुळे जनतेला इजा होत असल्यामुळे ध्वनीप्रदुषण तसेच लेझर लाईट मुळे जनतेला नुकसाण होवु नये करीता जिल्हयातील पोलीस स्टेशन तसेच मा.पोलीस अधीक्षक वाशिम यांना निवेदण दिले आहेत. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे.

मा.जिल्हाधिकारी श्रीमती बुवनश्वरी एस व मा.पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे यांनी डि.जे. मुक्त गणपती ही संकल्पना राबवावी असे गणेश मंडळांना व जनतेला आवाहन केले आहे. मा.पोलीस अधीक्षक अनुज तारे हे डि.जे.ऑथॉरीटी चे सक्षम अधिकारी आहेत.

डि.जे. चे अनियंत्रीत आवाज व लेजर लाईट मुळे जनतेस मोठया प्रमाणात नुकसाणीच्या घटना घडत असल्याच्या कर्णबधीर तज्ञ व नेत्ररोगतज्ञांनी कळविले आहे. त्याअनुषंगाने जिल्हयातील जनतेला नुकसाण होवु नये करीता जिल्हयातील डि.जे. धारकांवर पोलीस दलामार्फत कडक कारवाया करण्यात येणार आहेत. डि.जे. मुळे जनतेला कानाच्या किंवा डोळयांच्या ईजा झाल्यास गणेश मंडळावर तसेच डि.जे.धारकांवर कारवाई करण्यात येईल

जिल्हयामध्ये आज पावेतो एकुण ०९ डि.जे. धारकांवर दंडात्मक कारवाया करुन १,८५,५०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. एकुण ५७ डि.जे.धारकांना नियमांचे उलंघन झालयास त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येईल याबाबत पोलीस विभागातर्फे नोटीस देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्हयातील एकुण ६७३ गणेश मंडळांना ध्वनी प्रदुषण होवु नये याकरीता नोटीस देण्यात आल्या आहेत. नोटीसची बजावणीचे उल्लंघन झाल्यास डि.जे.धारकांचे सर्व परवाने रद्द करण्यात येवुन डि.जे धारक/मालक यांचेवर अटकेची कारवाई करण्यात येणारे आहे. बाहेर जिल्हयातुन येणा–या डि.जे.करीता आर.टी.ओ. तसेच ठाणेदारांना नाकाबंदीचे आदेश देण्यात आले आहेत.

ध्वनीप्रदुषण विनिमय व नियंत्रण अधिनियम २००० कलम ८ प्रमाणे ध्वनीप्रदुषणामुळे अनेक लोकांना, वृध्दांना, रुग्णांना मानसिक तसेच शारिरीक त्रास होतो मा.सर्वोच्य न्यायालय यांचे निर्देशानुसार तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम सन १९८६ सह ध्वनीप्रदुषण विनियमन व नियंत्रण नियमावली २००० चे अन्वये ध्वनिक्षेपक / लाउडस्पिकर, संगीत वाद्य व इतर वाद्यांचा वापर शासनाने रात्री २२.०० ते २४.०० वा. पावेतो निवासी क्षेत्रामध्ये दिवसा ५५ डी.बी. तसेच रात्री ४५ डी.बी. अशा ठरवुन दिलेल्या डेसीबल क्षमतेपेक्षा जास्त मर्यादेची आवाजाची पातळी ओलांडु नये.

आर.टी.ओ. चे अधिनियमान्वये डि.जे. वाहनांनी अल्टरनेशन विधाउट परमीशन चेंज इन टाईप ऑफ बॉडी, अन्वये कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम